श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,मुख्याध्यापक, जि.प.प्राथ.शाळा टाकळी ता.कोपरगाव यांचे कामकाजातील अनियमितते बाबत शिस्तभंगाची कार्यवाही करणे बाबत

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश.क्र.कार्या-2/खाचौ(उ)/2519/४२५/2022
अहमदनगर दि.१५/०९/2022

संदर्भः-1. इकडील कार्यालयाचा सेवा निलंबन आदेश क्र.कार्या-2/खाचौउ/527/2019 दि.06/11/2019

2. या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.कार्या-2/खाचौ(उ)/233/2020 दि.12/05/2020
3. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचा नियुक्ती आदेश क्र. कार्या-2/खाचौ (उ)/306/2020 दि.12/06/2020.
4. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.4//खाचौ/ सी.आर.66/2020 दि.20 एप्रिल 2021
5. या कार्यालयाकडील अंतिम आदेश जा.क्र.कार्या-2/खाचौ(उ)/339/2021 दि.13/10/2021
6. मा.अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील निकाल पत्र दि.10/02/2022
7. मा.मु.का.अ.जि.प.अ.नगर यांचेकडील सुनावणी दि.11/04/2022 व दि.29/04/2022
8. श्री.कासार आर.के.(लेखाधिकारी) सर्व शिक्षा अभियान जि.प.अ.नगर यांचेकडील. दि.25/07/2022 चा चौकशी अहवाल
9. श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचा खुलासा दि.23/08/2022
10. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964
11. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील विभागीय चौकशी नियमपुस्तिका 1991

श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,मुख्याध्यापक जि.प.प्राथ.शाळा टाकळी ता.कोपरगाव येथे कार्यरत असताना त्यांनी शाळेतील विदयार्थ्यांना मारहाण करणे,आत्महत्या करणे संदर्भात प्रसारमाध्यमांना वृत्त देणे,शालेय अभिलेखे अपुर्ण ठेवणे व मुदतबाहय शालेय पोषण आहार शाळेत ठेवणे आदी प्रकरणी गैरवर्तन व अनियमितता केलेली होती सबब श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे, मुख्याध्यापक यांना दि.06/11/2019 चे आदेशान्वये सेवा निलंबित करणेत येवुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेसाठी दि.12/05/2020 अन्वये दोषारोप 1 ते 4 निश्चित करणेत आलेले होते. सबब श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे दोषारोपाची मा. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडे चौकशी प्रस्तावित केलेली असता मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक यांनी दि.20/04/2021 अन्वये श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे दोषारोपातील शालेय विदयार्थ्यांना मारहाण करणे,शालेय अभिलेखे अपुर्ण ठेवणे हे दोन आरोप अंशत: तर आत्महत्या करणे संदर्भात वृत्त प्रसिध्द करणे,मुदतबाहय आहार ठेवणे हे आरोप पुर्णत:सिध्द होत असलेचा निष्कर्ष सादर केलेला आहे परिणामी दि.13/10/2021 चे आदेशान्वये श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी यांना सेवेतून कमी करणे ही शास्ती अंतिम केलेली आहे. परिणामी श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांनी दि.13/10/2021 चे शिक्षेचे आदेशाविरुध्द अपर आयुक्त यांचेकडे अपील दाखल केलेले होते.

अपर आयुक्त नाशिक यांनी प्रकरणी दि.10/02/2022 अन्वये श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी मुख्याध्यापक यांचे अपिल अशंत: मान्य केलेले असुन शिक्षेचा आदेश रद्द केलेला आहे. तसेच प्रकरणी श्री.सोनवणे सुभाष कोंडाजी यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊन दोषसिध्दीचे प्रमाणात फेर आदेश पारित करणेबाबत आदेशित केलेले आहे. तसेच सदर अपिला आदेशामधील खालील मुदयावर चौकशी करणेबाबत निर्देशित केलेले होते.

4. श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा टाकळी ता.कोपरगाव येथे कार्यरत असताना दि.25/07/2019 रोजी शालेय विदयार्थ्यांना मारहाण करण्याची घटना घडल्याचे आम्हाला माहित नाही असे लेखी देणा-या श्री.सिन्नरकर आरती मच्छिंद्र,श्रीम.भालेराव सुनिता आनंदराव यांना गटशिक्षणाधिकारी पं.स.कोपरगाव यांनी त्यांचेकडील दि.29/07/2019 अन्वये नोटीसीत मारहाण झालेले विदयार्थी रोहित एकनाथ झुंगळे,संदिप योव्हान शिनगारे व प्रमोद लक्ष्मण शिलावंत यांचा लेखी जबाबाचा संदर्भ देऊन खुलासा मागविण्यात आलेला दिसुन येतो त्यानुसार संबधित शिक्षकांनी सदर नोटीसीला गटशिक्षणाधिकारी पं.स.कोपरगाव यांना काय खुलासा सादर केला ?

5. मॉडेल स्कुल साठीचा खर्चाचा दि.28/3/2018 रोजीच्या गोषवा-यामध्ये दि.30/3/2016 रोजी सर्व शिक्षा अभियान खात्यावर रु.3,50,000/- जमा झाल्याचे नमूद असुन बिले व कोटेशनची रक्कम रु.3,58,598/- नमूद आहे सदर तफावत कशी?
6. पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील दि.24/04/2018 रोजी मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा टाकळी यांना लिहीलेल्या पत्रात सर्व शिक्षा अभियान,अपंग समावेशीत शिक्षण उपक्रमांतर्गत मॉडेल स्कूल निर्मितीसाठी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण अनुदान रु.3,50,000/- पैकी अप्राप्त साहित्याचे नाव व अनुदान निकष रक्कम प्रमाणे 1,56,000/- रुपयाची त्रुटी आढळून येत असल्याचे नमूद आहे.त्यामुळे प्रकरणी एकूण प्राप्त अनुदान व त्यापैकी किती खर्च झाले व किती शिल्लक आहे ? याविषयी सविस्तर चौकशी करणेबाबत नमुद आहे

सबब अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे अपिल निकालाप्रमाणे प्रकरणी कार्यवाही करणेसाठी दि.11/04/2022 रोजी व दि.29/04/2022 रोजी सुनावणी आयोजित करणेत येवुन श्री.सोनवणे सुभाष कौंडाजी यांना बाजु मांडणेची पुरेशी संधी दिलेली आहे. आहे अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील दि10/02/2022 चे निकालपत्रातील उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार गटशिक्षणाधिकारी कोपरगाव यांचेकडुन अहवाल घेतला असता दि.25/07/2019 रोजी शालेय विदयार्थ्यांना मारहाण करण्याची घटना घडल्याचे आम्हाला माहित नाही असे लेखी देणा-या श्री.सिन्नरकर आरती मच्छिंद्र,श्रीम.भालेराव सुनिता आनंदराव यांना दि.29/07/2019 अन्वये दिलेल्या नोटीसीचा खुलासा दिलेला नाही मात्र दि26/07/2019 रोजी श्रीम.सिन्नरकर उपाध्यापक यांनी विदयार्थ्यांना झालेल्या शिक्षेची माहीती उशीरा मिळालेचे नमुद केले आहे. तसेच दि.26/07/2019 रोजी श्रीम.भालेराव सुनिता उपाध्यापक यांनी मुलांनी दंगा खोडया केल्या म्हणुन 1-1 फटका मारला आहे. असे नमुद केले आहे.

जि.प.प्रा.शाळा टाकळी ता.कोपरगाव यांना सन 2010-2011 या वर्षी मॉडेलस्कुलसाठी साहीत्य खरेदीकरिता रक्कम रु.350000/- अनुदान उपलब्ध करुन दिलेले होते सदर अनुदानातील खर्चासंदर्भात सविस्तर मा.श्री.कासार आर.के.लेखाधिकारी(सर्व शिक्षा अभियान) यांचे पथकाने प्रमाणकासह तपासणी केली असता श्री.सोनवणे सुभाष कौंडाजी यांनी मॉडेलस्कुल करिता साहीत्य खरेदी करतांना खालील प्रमाणे अनियमितता केलेचे निदर्शनात आलेले आहे.

(1) एकाच कामासाठी वेगवेगळे प्रमाणके दर्शवून रक्कम अदा केलेली आहे

(2) सर्व प्रमाणकांवर शाळा समिती अध्यक्ष यांच्या सहया घेतले नसल्याचे दिसून आले आहे.

(3) सभेमध्ये अथवा बैठकीमध्ये खर्च करण्याची परवानगी अथवा खर्च मंजूरी आदेश काढण्यात आहे नाहीत व तसे प्रमाणके सोबत मंजूरी बाबत कागदपत्र कोणतेही जोडलेले नाहीत.

(4) बहूतांश प्रमाणके हे मुख्याध्यापक नावाने व रोख रुपात व्यवहार केले असल्याचे तपासणीत दिसून येतात.

(5) शा. नि. उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 30/1/2016 नूसार उपरोक्त नमूद काही प्रमाणकांना दरपत्रके न मागविताच खरेदी केली आहे.त्यामूळे वित्तीय अनियमितता झाली आहे.

(6) पुरवठादार सुभदा एंन्टरप्रायजेस, हडपसर, पूणे यांचे कडून प्रमाणक क्र.14 दिनांक 17/8/2017 अन्वये एंजल सॉप्टवेअर खरेदी केले आहे. परंतू सदर सॉप्टवेअर संगणकामध्ये लोड केले नसल्याचे गट शिक्षणाधिकारी, कोपरगाव यांनी त्यांचे दिनांक 18/7/2022 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच सदर एंजेल सॉप्टवेअर वरुन मूलांना माहीती/ शिक्षण दिल्याचेही दिसून येत नाही.मुलांसाठी वापर केले असल्याची नोंद रजिस्टरलाही घेण्यात आली नाही.सदर एंजेल सॉप्टवेअरची पूर्ण रक्कम वसूल करावी असे मत आहे.

(7) बहूतांश प्रमाणकावर प्रमाणक क्रमांक टाकले नाहीत. उदा वरील अ.क्र.20 प्रमाणके तसेच सर्व प्रमाणकांवर पेन्सिलने प्रमाणक क्रमांक टाकले आहेत. त्यामूळे प्रमाणके व रोजनिशी या मध्ये तफावत आढळून येतात.

(8) रोखीचे व्यवहार व पेड बाय मी केल्याने काही व्यवहार कॅशबूक व पासबूक मध्ये पुरवठादाराला पैसे दिल्याचे नोंद दिसून येत नाही. त्यामूळे पुरवठादाराला पैसे मिळाल्याची खात्री देता येत नाही.

(9) रोजनिशीमध्ये समग्र शिक्षा योजनेचे सर्वच व्यवहाराची नोंदी असल्याने मॉडेल स्कूलसाठी साहीत्य खरेदीसाठी देण्यात आलेला निधी रक्कम रुपये 3,50,000/- ही त्यातच नोंदविले असल्याने संबंधित प्रमाणके एकत्रित असल्याने उपरोक्त नमूद काही प्रमाणके इतर अनूदानातून खर्च असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

(10) डेड स्टॉक रजिस्टर विहीत नमून्यात ठेवल्यात आलेचे दिसून आले नाही.

(11) ॲडव्हान्स ॲग्रिम दिल्याची वरील प्रमाणकावरुन दिसून आले उदा: अ.क्र.13 ,23 वरुन दिसून आले तथापी ॲडव्हान्स नोंदवही ठेवले नसल्याचे दिसून आले नाही. त्यामूळे दिलेला कर्मचा-याला ॲडव्हान्स वसूल केल्याची खात्री करता आली नाही.तसेच त्याची कॅशबुकला जमा केल्याची नोंद दिसून येत नाही.

(12) चेक रजिस्टर/नोंदवही ठेवण्यात आले नाही. त्यामूळे पुरवठादाराला सर्व व्यवहार चेकने ü केल्याचे दिसून येत नाही, तथापी काही नोंदी पासबूक ला चेक दिल्याचे दिसून येतात.

(13) काही बीलांवर /देयकावर दिनांक नमूद केलेले नाही. तसेच ठेकदार अथवा दुकानदार यांना पैसे मिळाल्याची पोहच घेतल्याचे दिसून आली नाही.

(14) वरील तक्ता क्र.3 मधील अ.क्र.7 दिलेले अग्रिम 1325/- बाबत प्रत्येक्ष बीलावर 1325/- किंमत दर्शविली आहे. परंतू संबंधित पुरवठादाराला दिलेले चेक फक्त र .रु. 1100/- चेक दिल्याचे दिसून आहे आहे.

तसेच चौकशी समिती दिनांक 14/7/2022 रोजी जिल्हा परिषद, शाळा कोपरगांव येथे चौकशीकामी गेली असता सदर शाळेत प्रत्यक्ष पाहणीत प्रोजेक्टर 1नग, संगणक-1संच, दुरदर्शन संच, कपाट इ. जूने साहीत्य असल्याचे दिसून आले.सदर वस्तूची देयके, दरपत्रके, तसेच जडसंग्रह नोंदवहीत नोंदी आढळून आल्या नाहीत.

मॉडेल स्कूलसाठी साहीत्य खरेदीसाठी दिलेले अनूदान रक्कम रुपये 3,50,000/-पैकी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक 26/3/2012 आदेशातील निकषा प्रमाणे 1,48,100/- वस्तूची खरेदी केली आहे. आणि नियमबाहय जास्तीची वस्तू रक्कम रुपये 1,42,861/- खर्च केल्याने मॉडेलस्कूल साहीत्य खरेदीत अनियमितता दिसून आल्याने संबंधिताकडून रक्कम रुपये 2,01,900/- वसूल करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सबब उक्त प्रकरणी आपणाकडुन मॉडेल स्कुलसाठी साहित्य खरेदी प्रक्रीयेत अनियमितता झालेने आपणाविरुदध महाराष्ट्र राज्य जि.प. से.(शिस्त व अपिल) नियम 1964चे नियम 04 नुसार समय श्रेणीतील निम्न स्तरावर आणणे ही शिक्षा प्रस्तावित करुन आपणाकडुन वसुलपात्र रक्कम रु.201900/- वसुल का करण्यात येवु नये अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली आहे.

श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांनी दि.23/08/2022 अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा सादर केला असुन मॉडेल स्कुल साहित्य खरेदीसाठी रक्कम रु.3,50,000/- रुपये अनुदान सन 2010 मध्ये उपलब्ध करुन दिलेले होते मात्र सदरील साहित्यासाठी खरेदी सन 2018-19 मध्ये झालेली असल्याने बाजारभाव वाढलेले असल्याने साहित्याची जास्त भावाने खरेदी करावी लागली व चुकीमुळे /अनावधानाने वरीष्ठांची परवानगी घेण्याचे लक्षात आले नाही. त्यामुळे वसुलपात्र रक्कम रु.2,01,900/- पगारातुन हप्त्या हप्त्याने वसुल करुन देण्यास तयार असलेचा खुलासा सादर कलेला आहे.

श्री. सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे खुलाशाचे अवलोकन केले असता प्रकरणी अनियमितता केलेचे श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांनी कबुल केलेले असलेने मॉडेल स्कुल साहित्य खरेदीची रक्कम रु.2,01,900/- श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांचे वेतनातुन समान 10 हप्त्यातमध्ये वसुल करण्यात यावी.तसेच म.जि.प.से.(नियम व अपील) नियम 1964 मधील नियम 05 नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारा नुसार श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे मुख्याध्यापक यांना सदरील अनियमितते प्रकरणी श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे, मुख्याध्यापक यांना **समयश्रेणीतील निम्न स्तरावर आणणे** शिक्षा कायम करण्यात येत आहे..

सदर आदेशाची नोंद श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे, मुख्याध्यापक यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध् करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20220915160137 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे,
जि.प.प्रा.शाळा----------ता.----------
व्दारा
गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती----------

2/- श्री.सुभाष कोंडाजी सोनवणे यांना दयावायाचे अंतिम शिक्षेच्या आदेशाच्या 03 प्रती यासोबत जोडुन पाठविणेत येत आहे तरी संबधीतांना मुळ आदेश बजावुन दुय्यम प्रतीवर संबधीताची दिनांकित स्वाक्षरी घेवुन एक प्रत इकडे उलटटपाली सादर करावा.तसेच श्री. सुभाष कोंडाजी सोनवणे मुख्याध्यांपक यांचे वेतनातुन रक्कम रु.2,01,900/- समान 10 हप्त्यात वेतनातुन वसुल करुन शासन सदरी जमा करावी.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर